# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

दि.०१.०४.२०२२

**आलोसे १) श्री.योगेश्वर नागनाथराव टोंपे, वय–३२, व्यवसाय–नोकरी, तहसिलदार, तहसिल कार्यालय बोदवड रा.मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जि.जळगांव २) श्री.अनिल रावजी पाटील, व्यवसाय–नोकरी तहसिलदार यांचे शासकीय वाहनावरील चालक, रा.चिखली ता.बोदवड जि.जळगांव ३) मंगेश वासुदेव पारीसे, व्यवसाय–नोकरी तलाठी सजा बोदवड रा.बोदवड ता.बोदवड जि.जळगांव ४) शरद समाधान जगताप, व्यवसाय–मजुरी रा.बोदवड, ता.बोदवड जि.जळगांव यांना ८,०००/–रु.लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वीकारंताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगांव यांची कारवाई.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | बोदवड पो.स्टे. गु.र.नं. ००३७/२०२२ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८,कलम–७, ७अ व १२ प्रमाणे... |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | **१)** श्री.योगेश्वर नागनाथराव टोंपे, वय–३२, व्यवसाय–नोकरी, तहसिलदार, तहसिल कार्यालय बोदवड रा.मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर जि.जळगांव **(महसुल विभाग, वर्ग–१)**<br>**२)** श्री.अनिल रावजी पाटील, व्यवसाय–नोकरी तहसिलदार यांचे शासकीय वाहनावरील चालक, रा.चिखली ता.बोदवड जि.जळगांव<br>**(महसुल विभाग, वर्ग–३)**<br>**३)** मंगेश वासुदेव पारीसे, व्यवसाय–नोकरी तलाठी सजा बोदवड रा.बोदवड ता.बोदवड जि.जळगांव **(महसुल विभाग, वर्ग–३)**<br>**४)** शरद समाधान जगताप, व्यवसाय–मजुरी रा.बोदवड, ता.बोदवड जि.जळगांव **(खाजगी इसम)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.३०/०३/२०२२<br>८,०००/–रु. लाचेची मागणी करुन स्वीकारले. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | ८,०००/–रु. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.०२/०४/२०२२ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील तक्रारदार यांचेकडेस दोन डंपर असुन सदर डंपरव्दारे ते बांधकामासाठी लागणारे मुरुम,वाळु,खडी इ.साहित्याची वाहतुक करतात. दि.२०.०३.२०२२ रोजी यातील आरोपी क्रं.०३ यांनी तक्रारदारास तुम्हाला डंपरव्दारे वाळु वाहतुक करु देण्यासाठी व डंपरवर कारवाई न करण्यासाठी ३,०००/–रु लाचेची मागणी केली. तसेच दि.२५.०३.२०२२ रोजी तक्रारदार यांचे डंपर गुजरात येथुन शासकीय रॉयल्टी भरुन वाळुची वाहतुक करीत असतांना यातील आरोपी क्रं.१,२ व आरोपी क्रं.४ यांनी सदरचे डंपर थांबवून ठेवले त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांना रॉयल्टीची पावती दाखविली तरी सुद्धा तुम्ही चुकीच्या मार्गाने वाळु वाहतुक करत असल्याचे सांगुन आरोपी क्रं.२ व ४ यांनी तक्रारदार यांना तुम्ही तहसिलदार साहेब व आम्हास दरमहा २३,०००/–रुपये व आता डंपर सोडायचे १०,०००/–रुपये देवुन द्या असे सांगितले त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना २३,०००/–रुपये त्याच जागी दिले.<br>यातील आरोपी क्रं.१,२ व ४ यांनी १०,०००/–रुपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तसेच आरोपी क्रं.३ यांनी ३,०००/–रुपये लाचेची मागणी केली असल्याबाबत फिर्यादी यांनी दि.३०.०३.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष दि.३०.०३.२०२२ रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी क्रं.२ व ४ यांनी तक्रारदार यांचेकडेस तडजोडीअंती ५,०००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी क्रं.४ यांचेकडे देण्यास सांगितले व आरोपी क्रं.१ यांनी सदर अपराधास सहाय्य केरुन प्रोत्साहन दिले. तसेच,आरोपी क्रं.३ यांनी तक्रारदार यांचेकडेस ३,०००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आरोपी क्रं.४ यांनी दि.०१/०४/२०२२ रोजी स्वत: वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री क्रमांक:–** १०६४

**दुरध्वनी क्रमांक:–** ०२५७–२२३५४७७

**व्हॉटस्अॅप क्रमांक:–** ८७६६४१२५२९

01-4-2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**